**International Journal of Research in Social Sciences**
Vol. 13 Issue 3, March 2023,
ISSN: 2249-2496 Impact Factor: 7.081
Journal Homepage: http://www.ijmra.us, Email: editorijmie@gmail.com
Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International Journal - Included in the International Serial Directories Indexed & Listed at: Ulrich's Periodicals Directory ©, U.S.A., Open J-Gate as well as in Cabell's Directories of Publishing Opportunities, U.S.A

# छत्रपती शिवाजी महाराजांचे आगऱ्याहून सुटकेनंतरचे वास्तव्य : मनोहरगड

**डॉ.एस.डी. सावंत**
इतिहास विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, उदगीर
जि.लातूर
मोबा.८१४९२७३७४२
ई—मेल gaurisawant55@gmail.com

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी विविध राजांना भेटी दिलेल्या होत्या. त्यात त्यांना अनेकवेळा दगाफटका करण्याचा प्रयत्न केला गेला; मात्र महाराजांनी अत्यंत शिताफीने तो परतावलेला दिसून येतो. यातील एक महत्त्वपूर्ण भेट म्हणजे आगरा येथे औरंगजेबाशी झालेली भेट होय. छत्रपती शिवाजी महाराज इ.स.१६६६ मध्ये आग्रा येथे औरंगजेबाच्या भेटीस गेले होते. त्यानंतर त्यांनी स्वत:ची व राजपुत्र संभाजी राजाची सुटका करून घेतली होती. हा इतिहास सर्वश्रुत आहे. परंतु शिवाजी महाराज स्वराज्यात जलद गतीने अत्यंत विचार बुद्धीने संभाजी महाराजांना शत्रुच्या मुलुखात सोडून अत्यंत जवळच्या मार्गाने स्वराज्यात परत आले व आल्यानंतर छत्रपती संभाजी राजे स्वराज्यात सुखरूप येईपर्यंत अत्यंत गुप्त पद्धतीने राहिले. बहुदा ते स्वराज्यात परत येताना राजे २२ जुले १९६६ रोजी आगऱ्याहून बाहेर पडून साधारणत: ५ सप्टेंबरच्या सुमारास आपल्या मावळ्यांसह मराठा सरदाराच्या वेशात चांदवडला पोहोचले.

याची दोन उद्दिष्ट्ये दिसून येतात. १) आपण स्वत: स्वराज्यात आलो आहोत ही बातमी गुप्त ठेवणे व २) पूर्वी ठरलेल्या योजनेप्रमाणे संभाजीला स्वराज्यात परत आणणे. या दोन उद्दिष्टांसाठी महाराज सुखरूप व गुप्त पद्धतीने वास्तव करणे जरूरीचे होते. खरे तर रायगड किंवा स्वराज्यातील कोणत्याही किल्ल्यावर राहणे धोकादायक होते. कारण मोगल बादशहा औरंगजेब कोणत्याही वेळेस सैन्य पाठवेल याची भीती होती. म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी नाशिक परिसरातील सह्याद्रीच्या डोंगररांगामधील अनेक छोट्या—मोठ्या दुर्गम किल्ल्यांपैकी, दुर्लक्षित किल्ल्यांपैकी एक असलेल्या 'मनोहरगड' या किल्ल्यात राहण्याचे ठरविलेले होते. याचा पुरावा पोर्तुगीज कागदपत्रांमध्ये सापडतो.

१५ जुलै १६६७ रोजी गोव्याच्या पोर्तुगीज व्हाईसरॉयने शिवाजी महाराजांना लिहिलेल्या पत्रातील मजकूर असा आहे, रामोजी शिवजी कोठारी यांच्याकडून असे कळवले होते की, आग्रा येथील कैदेतून सुटून आपण आपल्या स्वराज्यात सुखरुप पोहोचलो आहोत आणि मनोहरगड येथे

**International Journal of Research in Social Sciences**
Vol. 13Issue 3, March 2023,
ISSN: 2249-2496 Impact Factor: 7.081
Journal Homepage: http://www.ijmra.us, Email: editorijmie@gmail.com
Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International Journal - Included in the International Serial Directories Indexed & Listed at: Ulrich's Periodicals Directory ©, U.S.A., Open J-Gate as well as in Cabell's Directories of Publishing Opportunities, U.S.A

राहत आहा. पोर्तुगालकडून इकडे येताना मी आपली माहिती मिळविली आणि मनोहरगड येथे राहत असतानाच वकील पाठवण्याचे योजले होते. परंतु रामोजीकडून समजले की, त्या किल्ल्यावर जाण्याची वाट फार बिकट आहे. आपण तेथून निघून रायगडी जाऊन राहणर. यास्तव मोहनगड असता वकील पाठविला नाही. परंतु आपण रायगडी मुक्काम केला आहे त्यावरून हे पत्र पाठवित आहे.[१] या पत्रातील पोर्तुगीजांचे हे पत्र १५ जुलै १६६७ चे आहे. हे जरी असले तरी या पत्रातून महाराज आगऱ्यावरून सुटल्यानंतरच्या हालचालींनी नोंद होते. म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज आगऱ्यावरून परत येताच मनोहरगडावर राहिले असे अनुमान निघते.

आता मनोहरगडासंबंधी माहिती बघूया. महाराष्ट्रात ज्ञात असलेल्या किल्ल्यांमध्ये एकत्र मनोहरगडची नोंद सापडते. हा किल्ला सावंतवाडीच्या ईशान्येला १५ मैलांवर आहे. येथे दोन गड जवळ—जवळ आहेत, किंबहुना जे जोडकिल्ले आहेत ते मनोहरगड व मनसंतोषगड या नावाने अस्तित्वात आहेत.[२] परंतु हे किल्ले शिवाजी महाराजांना रायगडापासून दूर असल्याने निवडणे शक्य नव्हते. कारण स्वराज्याच्या उत्तर सीमेवर महाराजांना लक्ष देऊन राहवयाचे होते. म्हणून हे किल्ले त्यांनी निवडले नाहीत.

मध्ययुगातील मुस्लीम राजवटींनी अल्लाउद्दीन खिलजीपासून ते औरंगजेबाच्या काळापर्यंत या राजकीय सत्तांनी वेगवेगळ्या किल्यांवर वास्तव केले होते. त्यांनी तत्कालीन काळात त्या—त्या किल्ल्यांना वेगवेगळी नावे दिलेली होती. त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांना दोन—दोन नावे आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी तर जिंकलेल्या व पुनर्बांधली केलेल्या अनेक किल्ल्यांची नावे बदललेली होती. म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील मनोहरगड शोधताना त्यांच्या संदर्भांचा विचार करावा लागतो. विविध मराठी बखरीमध्ये मराठ्यांच्या किल्लयांच्या याद्या दिलेल्या आहेत. यामध्ये पुरातनगढ व राजांनी बांधलेले गड यांची विभागणी प्रांतवार पद्धतीने केलेली आहे.

सभासद बखर 'गडरास पाहिली' या मथळ्याखाली जुन्या किल्ल्यांची यादी दिलेली आहे. त्यात दिलेल्या ४९ किल्ल्यांमध्ये मनोहरगडाचा उल्लेख आहे. परंतु तो कोणत्या प्रांतात आहे समजत नाही. 'राजांनी गड वसविले' या मथळ्याखाली १०८ व कर्नाटक प्रांताचे गड या मथळ्याखाली ७९ गडांमध्ये मनोहर गडाचा उल्लेख नाही.[३] शिवदिग्विजयात दिलेल्या गडाच्या यादीमध्ये कोकण प्रांतातील सावंतवाडीजवळच्या मनोहरडाचा उल्लेख सापडतो.[४] चिटणीस बखरीत प्रांतवार गडाची यादी दिली आहे. श्रीरंगन प्रांत या तीनही प्रांताच्या यादीत एक—एक मनोहर गडाचा उल्लेख सापडतो.[५] 'सातारचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंश व प्रतिनिधी व अष्टप्रधान यांचा इतिहास' या ग्रंथामध्ये कोकण प्रांत, कर्नाटक प्रांत अशा तीन्ही प्रांतांच्या याद्यांमध्ये प्रत्येकी एका मनोहरगडाचा उल्लेख आलेला आहे.[६] यापैकी कोकण व

कर्नाटक प्रांताची शिवाजी राजे निवड करणार नाहीत. मात्र त्र्यंबक प्रांतातील मनोहरगडाची निवड महाराजांनी केली असावी. शिवाजी महाराज आगऱ्याकडे गेल्यानंतर १७ जुलै १६६६ रोजी ॲन्टोनियो डी. मेलो कास्टो गोव्यातील पोर्तुगीत राज्याचा कारभार कोंडो डी. साओ विसेंट या नव्या गर्व्हनरकडे सुपूर्द केला. त्यानंतर १९६६ च्या डिसेंबरमध्ये कोजे ऑर्डाल मुहंमद या औरंगजेबाच्या दुतामार्फत पोर्तुगीजांबरोबर तह केला. त्यात कोडो डी साओ विसेंट याने १९ एप्रिल १६६७ ला लिहिलेल्या पत्रात मराठ्यांविरोधी मोगलांना आरमारी मदत करण्याचे मान्य केले. परंतु १६६६ मध्ये शिवाजी महाराज स्वराज्यात पोहचल्याने औरंगजेबाला शिवाजींशी जमवून घ्यावे लागले. अशा बदललेल्या परिस्थितीत कोडो डी. साओ विसेंट यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना पत्र लिहिले. १५ जुलै १६६७ चे हे पत्र शिवाजी राजांच्या दाभोळच्या सुभेदाराकडे पाठवले. या पत्रात ''रामोजी शेवणी कोठारी याज कडून मला समजले की, आता आपण आपल्या राज्यात पोहचले अहात? आणि सर्व धोक्यानमधून मुक्त होवून आपण मनोहरगडमध्ये राहत आहात. हे ऐकून मला आनंद झाला. कारण मी नेहमीच येथे आपले व आपल्या योजनांचे भले चिंतीले आहे.''[७] या पत्राला शिवाजी महाराजांनी कोणतेच उत्तर दिलेले दिसत नाही. या पत्रात मात्र मनोहरगडाची वाट बिकट आहे, खूप धोक्याची आहे व मनोहरगड रायगडाच्या गोव्याच्या अधिक जवळ आहे म्हणजे सावंतवाडी जवळच्या मनोहरगडच्या संदर्भातून उल्लेख येतो. म्हणजे शेवटी राहतो तो फक्त त्र्यंबक प्रांतातील मनोहरगड आणि म्हणून नाशिक जवळच्या त्र्यंबक प्रांतातील हा मनोहरगड असला पाहिजे. मग हा गड शोधण्यासाठी त्या काळातील कागदपत्रातील याद्या आणि भौगोलिक स्थाने यांचा वापर करून सांगड घालावी लागते.

'चिटणीस बखर' व 'सातारचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंश व प्रतिनिधी व अष्टप्रधान यांचा इतिहास' यांच्या बखरीतील गडांची यादी समोरासमोर मांडल्यास

१) चांदवडी— चांदवड
२) हरिषचंद्र— इरद्राई
३) राजदेहर— राजदेहर (राजदेर)
४) मनोहरगड— कौलधर (कैलदेहर)
५) मृगगड — कांचना

यावरून राजदेहर (राजदेर) मनोहरगड म्हणजे कौलदेहर नंतर मनोहरगड असा उल्लेख म्हणजे आजचा आणि पुरान काळातील कौलदेहर किल्ला असा अनुमान निघतो. याचा अर्थ असा आहे की, शिवाजी महाराजांनी तत्कालीन काळात अनेक किल्ल्यांची नावे बदलली व त्याचे नाव 'मनोहरगड' असे ठेवले. कारण शिवाजी महाराजांच्या बखरीत कौलदेहर हे नावच

**International Journal of Research in Social Sciences**
Vol. 13Issue 3, March 2023,
ISSN: 2249-2496 Impact Factor: 7.081
Journal Homepage: http://www.ijmra.us, Email: editorijmie@gmail.com
Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International Journal - Included in the International Serial Directories Indexed & Listed at: Ulrich's Periodicals Directory ©, U.S.A., Open J-Gate as well as in Cabell's Directories of Publishing Opportunities, U.S.A

दिसत नाही. हे शिवाजी महाराजांनी का केले असावे तर एखाद्या हेराने शिवाजी महाराज आगऱ्याच्या सुटकेनंतर मनोहर गडावर मुक्कावर आहे असे सांगितले तर त्यांची दिशाभूल व्हावी म्हणून दोन—दोन मनोहर गडाचा उल्लेख येत असावा. म्हणून शिवाजी महाराज तत्कालीन काळातील नाशिक प्रांतातील कौलदेहर ऊर्फ मनोहरगड येथेच गुप्त पद्धतीने वास्तव्य करत असावेत. यातून त्यांनी मोगलांना व पोर्तुगीजांचीही दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.[८]

प्रस्तुत राजदेहर—कौलदेहर ऊर्फ मनोहर गडावर अतिप्राचीन काळापासून वेगवेगळ्या राजवटींनी वास्तव्य केल्याचे दिसते. देवगिरीचे यादव, चालुक्याचे सामंत, तिसरा गोविंद राष्ट्रकुट व त्यानंतर सातवाहन अशा राजवटींनी राज्य केले. अलिकडे ब्रिटिशांच्या काळात एप्रिल १८१८ ला इंग्रजांचे सैन्य राजदेहरच्या मुक्कामावर होते. हा किल्ला इंग्रजांनी १० एप्रिल १८१८ ला ताब्यात घेतला.[९] हा किल्ला उंच डोंगरावर असल्याने व अवघड कड्या कपाऱ्या असल्याने सहजासहजी किल्ल्यावर जाता येत नाही. किल्ल्यावर खालून वर जाताना आडव्या—उभ्या रस्त्यांची मुद्दामहून रचना करण्यात आली आहे व किल्ल्यावर अन्नसामग्री साठवून ठेवण्याची व्यवस्था एक वर्ष पुरेल इतकी ठेवण्यात येत होती.

आनंद पाळदे यांनी या गिरीमाळेतील अनेक दुर्गांची वर्णने केली आहेत. या सातमाळेच्या रांगेत पंधराहून अधिक दुर्गांची बांधणी झाली आहे. याशिवाय तितकीच इतरही शिखरे इथे आहेत. या डोंगराच्या पायथ्यापासून माथा अवघे तीन—साडेतीनशे मीटर. पण भिंतीसारखे उभे कातळ माथ्यावर चढताना जेरीस आणतात. यातीलच कांचना, कोळदेहर (कौलदेहर), राजदेहेर, इंद्राई आणि चांदवड... हे दुर्ग यांची बांधणी मुसलमानपूर्व कालीन निश्चित पण अनेक राजवटींचा साजही त्यावर चढलेला. भाऊड खिंडीच्या डावीकडे दुसरे शिखर कांचगडाचे (कांचना) आहे. पहिले वाफाळ्यांचे कांचना हा खरा जुना गड. खिंडीतून पलीकडे दुसरे गेले की, खानदेशातील कापसी हे गाव आहे. कोळदेहर (कौलदेहर) डाव्या बाजूला तर राजदेहेरवाडीची वाट उजवीकडे आहे. कोळदेहेरवर जाण्यास कड्यातील भेगेच्या पलीकडे पायऱ्यांची वाट आहे. गडाच्या मध्यात २०—३० मीटर उंचीचा कातळमाथा उठविला आहे. माथा गाठण्याची वाट मिळाली नाही. दुर्गसाखळीतला एक छोटा दुवा एवढेच त्याचे महत्त्व. उंबरखिंडीतून राजदेहेरची वाटचाल सुरू केली. दीड—दोन तासातच सपाटीवरून राजदेहेर डावीकडे अन् इंद्राई उजवीकडे अशा चिंचोळ्या खोऱ्यात आम्ही पोहोचलो. खोऱ्या मध्यावर राजदेहेरवाडी शेजारी बांध घालून एक ताव निर्मिला आहे. राजदेहेरचा माथा गांधीटोपीसारखा आहे. सर्व बाजूने ४०—५० मीटर उंचीचा कातळपट्टा वेढून आहे. या पट्ट्यापर्यंत पोचणे तीव्र चढण अन् काटेरी जाळ्या यामुळे त्रासदायक आहे. पूर्व टोकाला वाडीच्या बाजूला १५ मीटर कड्यातील पायऱ्या इंग्रजांनी तासून काढल्या आहेत. तिथे दारापाशी गावकरी ढोर बांधतात. राजदेहेरच्या खडकाळ व गवताळ

माथ्यावर एक मोठा तलाव, सुबक गुहा आणि मुसलमानकालीन इमारत व पीर या गडावरच्या वास्तू. इमारत पूर्व टोकाकडे आणि तिला तीन कमानी आहेत. राजदेहेरच्या दारापाशी व इंद्राईच्या पायथ्याशी एक—एक फारसी लेख आहे. इंद्राई (इंद्रगड) किल्ल्यावरही उत्तम तलाव आणि पुरातत्त्वीयदृष्ट्या महत्त्वाची लेणी आहेत.[११]

साधारणत: आजच्या नाशिक जिल्ह्यातील चांदवडच्या सात मैल अंतरावर कौलदेहर ऊर्फ मनोहरगड आहे तर दहा मैलावर कांचना. कौलदेहरच्या पुर्वेला राजदेहर किल्ला अस्तित्वात आहे. म्हणजे कौलदेहर (मनोहर), राजदेहेर व इंद्राई हे तीन किल्ले आहेत. साधारणत: १६६५—१६६६ मध्ये त्र्यंबक प्रांत शिवाजी महाराजांच्या ताब्यात होता.[१२]

२२ जुलै १६६६ ला आगऱ्याहून निघालेले छत्रपती शिवाजी महाराज ५ सप्टेंबरच्या सुमारास कौलदेहर मनोहरगडावर पोहोचले आणि त्या पाठोपाठ आगऱ्यातील गोंधळाची बातमी येऊन पोहचली. त्यातच संभाजी राजे मथुरेला सुरक्षित पोहचले होते. त्यानंतर महाराज स्वराज्यात पोहोचलेला निरोप व छ.शिवाजीला स्वराज्यात आणण्याचा आदेश महाराजांनी मनोहर गडावरून पाठवला होता. खास दूत २० सप्टेंबर १९६६ ला मथुरेस पोहचले असावेत.

इकडे महाराज अत्यंत गुप्तपणे मनोहर गडावर राहिले. त्यावेळेस मोजके सैन्य सोबत आणले होते. म्हणून राजांनी स्वराज्यात प्रतापराव गुजरांना निरोप पाठवून सुमारे चार—पाच हजार सैन्य नाशिक बागलाण प्रांतात एकवटण्यास सांगितले होते. त्याच वेळी संभाजी राजेचे वाटेत निधन झाल्याची अफवा स्वत: राजांनी पसरवली होती. त्यामुळे छ.संभाजी राजांचा परतीचा प्रवास सुखर झाला.

छ.शिवाजी महाराजांनी नाशिक बागलाणात सैन्य १६६६ ला जमा केल्याचे अनेक उल्लेख डच, इंग्रज, पोर्तुगीज आणि गोठाले दरबारात अनेक पत्रांमध्ये सापडतात. ते मुख्ये म्हणजे शिवाजीवर नजर ठेवून अनेक शक्ती कार्य करत होत्या.

प्रस्तुत प्रयोजनामध्ये शिवाजी महाराज सातमाळेच्या मनोहर गडावर गुप्तपणे राहिले व आपल्या जवळपास सैन्य जमा केले. सैन्याच्या जमवाजमवीची बातमी पसरली परंतु त्याचे कारण कुणाला समजू नये म्हणून स्वत: शिवाजी राजांनीच आपण सुरतेवर हल्ला करणार असल्याची अफवाही पसरवली होती. राजांच्या विविध योजनांप्रमाणे ही एक योजना असावी. त्या तंत्रानुसार अफवा पसरवली. ठरल्याप्रमाणे संभाजीराजे स्वराज्यात परत आले. तोपर्यंत महाराज याच किल्ल्यावर म्हणजे मनोहरगड ऊर्फ कैलदेहेर किल्ल्यावर गुप्तपणे आपल्या मोजक्या सैन्यानिशी राहिले व पुढे यथावकाश रायगडास परतले. आता प्रश्न हा आहे की, नाशिक, बागलाण, चांदवड भागातील हा अत्यंत दुर्गम असा किल्ला शिवाजी महाराजांचे वास्तव असणारा भक्कम किल्ला त्याचे नाव फारसे इतिहासाला माहित नसलेला, अडवळणी

वाटेत स्तभबद्ध असलेल्या या मनोहगडाचे स्वराज्याच्या रक्षणासाठी आत्यंतिक महत्त्वपूर्ण योगदान आहे. पुढील संशोधनासाठी या मनोहरगडाचे अनेक पैलू व महाराजांच्या आगऱ्याहून सुटका प्रकरणाला वेगळ्या पद्धतीने अभ्यासण्याची गरज आहे आणि मनोहर गडाचेही संशोधन योग्य पद्धतीने होणे अपेक्षित आहे.

छत्रपती शिवाजी महाराज

**संदर्भ**

१. शिवकालीन पत्रसार संग्रह खंड १ मध्ये १६६० क्रमांकावर छापले आहे त्यातील मजकूर
२. आनंद पाळदे—गीरीदुर्गाच्या पहाऱ्यातून, ग्रंथमित्र प्रकाशन, मुंबई, १९८६
३. कृष्णाजी अनंत सभासद विरचित छत्रपती शिवाजी राजे यांची बखर, संपादक श.ना. जोशी
४. श्री.शिवदिग्विजय बखर, पा.रा.नंदुरबारकर व लका दांडेकर पुरातन ऐतिहासिक प्रकाशक मंडळाची ग्रंथमाला, फत्तेसिंह छापखाना बडोदे, शक १२१७, १८९५ शिवदिग्विजय, डॉ. रा.चिं. ढेरे, अनमोल प्रकाशन, पुणे, १९७५
५. मल्हार रामराव कृत श्री.शिवछत्रपतींचे सप्तप्रकऱ्यात्मक चरित्र (चिटणीस बखर), रावबहादूर नि.ज. किर्तने, आवृत्ती दुसरी १९८४
६. सातारचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशजाचा व प्रतिनिधी आणि अष्टप्रधान यांचा इतिहास, वि.गो. भिडे, भोर छापखाना (शके १७८८), १८६६
७. पोर्तुगीज आणि मराठे पांडुरंग विसुर्लेकर, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे
८. डॉ.अजित जोशी, सुरतेहून सुटका, शिवप्रताप प्रकाशन, पुणे, जानेवारी २०१६
९. स.आ. जोगळेकर, सह्याद्री, प्रसाद प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती १९५२
१०. शि.म. परांजपे, मराठ्यांच्या लढ्याचा इतिहास १८८२/१८१८, चित्रशाळा प्रेस, पुणे, १९२८
११. आनंद पाळदे—गिरीदुर्गाच्या पहाऱ्यातून, ग्रंथमित्र प्रकाशन, मुंबई, १९८६
१२. प्र.के. घाणेकर, साद सह्याद्रीची भटकंती किल्ल्याची, स्नेहल प्रकाशन, पुणे, १९८५